पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे - १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.६

सभावृत्तांत

दिनांक ६/०९/२०१३ वेळ दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दि ६/०९/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता ड प्रभाग कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.सोनाली जम | अध्यक्षा |
| २... | मा.प्रमोद ताम्हणकर | सदस्य |
| ३. | मा..कैलासभाऊ थोपटे | सदस्य |
| ४. | मा.अप्पा पवार | सदस्य |
| ५. | मा.विलासराव नांदगुडे | सदस्य |
| ६. | मा.बापू काटे | सदस्य |
| ७. | मा.राजेंद्र जगताप | सदस्य |
| ८. | मा.विमल काळे | सदस्या |
| ९. | मा.निता पाडाळे | सदस्या |
| १०. | मा.अनिता तापकीर | सदस्या |
| ११. | मा.विमलताई जगताप | सदस्या |
| १२. | मा.झामाबाई बारणे | सदस्या |
| १३. | मा.स्वाती कलाटे | सदस्या |
| १४. | मा.आरती चोंधे | सदस्या |
| १५. | मा.शितल काटे | सदस्या |
| १६. | मा.वैशाली जवळकर | सदस्या |
| १७. | मा.शकुंतला धराडे | सदस्या |
| १८. | मा.शैलजा शितोळे | सदस्या |
| १९. | मा.सुषमा तनपुरे | सदस्या |

याशिवाय मा.व्ही.एम.इंगुळकर, प्रभारी प्रशासन अधिकारी, सभा शाखा मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.एस.एस.चव्हाण, कार्यकारी अभियंता विदयुत, मा.शरद जाधव, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.एम.डी.निकम , कार्यकारी अभियंता, जलनिसारण विभाग, मा.सोमनाथ परदेशी, उपअभियंता, स्थापत्य, मा.डी.एस.सोनवणे, उपअभियंता,स्थापत्य, मा.एस.डी.पोरेडी, उपअभियंता, स्थापत्य मा.रामनाथ टकले उपअभियंता, स्थापत्य, मा.रविंद्र पवार, उपअभियंता जलनिसारण

विभाग, मा.शेख, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.दिलीप धुमाळ, उपअभियंता , विदयुत, मा.पी.एस.केदारी, उपअभियंता विदयुत, मा.राजेंद्ग जावळे, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.व्ही.एल.चव्हाण सहा आरोग्याधिकारी , मा.बेडाळे, सहा.आरोग्याधिकारी , इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली. तदनंतर मा.अध्यक्ष यांनी मागील कार्यपत्रिका क्रमांक ५ दिनांक १६/८/२०१३ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे प्रकट केले. तदनंतर मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने व मा.सदस्य यांचे मागणीप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्र.१ प्रभाग क्रमांक ५९ मधील रस्त्याला नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२ गणेश विसर्जनासाठी घाटांवर विसर्जन हौद बांधणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.निताताई पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३ सार्वजनिक गणेशोत्सव २०१३ साठी विविध सोयी सुविधा अंतर्गत ड प्रभाग मधील प्रमुख विसर्जन घाटावर सीसीटीव्ही कॅमेरे तात्पुरते भाडे तत्वावर बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.निताताई पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४ प्रभाग क्रमांक ५६ वैदुवस्ती मधील जवळकरनगर येथील त्रिमुर्ती कॉलनी हे नांव बदलून तेथे समर्थ कॉलनी जवळकर नगर असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक २६ विषय क्र.१
दिनांक ६/०९/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा.सुषमा तनपुरे अनुमोदक - मा.निता पाडाळे

संदर्भ :- मा.सुषमा तनपुरे यांचा दिनांक ६/९/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

नवी सांगवी सर्व्हे नं.७९ प्रभाग क्र.५८ मध्ये फेम्स चौक ते साई चौक दरम्यान जागेचे मुळ मालक कै.ह.म.प.खंडेराव गोविंदराव ढमाले हे असून त्यांच्या स्मृती प्रित्यार्थ सदर रस्त्याला कै.ह.म.प.श्री.खंडेराव गोविंदराव ढमाले पथ असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक २७ विषय क्र.२
दिनांक ६/०९/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा.निता पाडाळे अनुमोदक - मा.वैशाली जवळकर

संदर्भ :- मा.निता पाडाळे यांचा दिनांक ६/९/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

सोबतच्या प्रपत्राप्रमाणे ड प्रभागांतर्गत गणेश विसर्जनाचे घाटांवर एकूण १६ ठिकाणी विसर्जन हौद बांधणेचे काम गणेश विसर्जनापुर्वी प्राधान्याने त्वरीत करुन घेणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक २८ विषय क्र.३
दिनांक ६/०९/२०१३ विभाग - विदयुत
सुचक - मा.निता पाडाळे अनुमोदक - मा.वैशाली जवळकर

संदर्भ :- मा.निता पाडाळे यांचा दिनांक ६/९/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

सार्वजनिक गणेश उत्सव २०१३ साठी विविध सोयी सुविधांतर्गत ड प्रभाग विदयुत कार्यक्षेत्राकडील प्रमुख गणपती विसर्जन घाटावर, विसर्जनाच्या दिवशी होणा-या गणेश उत्सवाचे गर्दीमुळे कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या हेतूने तसेच समाजकंटकांकडून घातपात , महिलांना छेडछाड , चोरी यासारख्या घटनावर देखरेख नियंत्रण व चित्रमुद्गण करणेकरीता भाडेतत्वावर सीसी टीव्ही कॅमेरे ऑपरेटरसह बसविणेकामी येणा-या र.रु.३,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

तसेच सदर काम नव्याने ड प्रभाग विदयुत कार्यालयामार्फत करणेत येणार असल्यामुळे त्यासाठी अंदाजपत्रकात स्वतंत्रपणे तरतुद केली नसल्यामुळे सन २०१३-२०१४ चे अंदाजपत्रकातील ड प्रभाग विदयुत विभागाकडील पानांक ८४-८५ वरील अ.क्र.६ ध्वनिक्षेपण व्यवस्था करणे हया महसुली लेखाशिर्षावरील तरतुद चालु वर्षी हया कामास

हया कामास वापरणेस तसेच वेळे अभावी सदर काम निविदा न मागविता परंतु मा.स्थायी समितीचे मान्यतेनंतर करारनामा करुन थेट पध्दतीने दर पत्रके मागवून करणेकामी अंमलबजावणीचे कार्यवाहीस मान्यता देणेत येत आहे.

सदर सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावावर अंमलबजावणी करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक २९ विषय क्र.४

दिनांक ६/०९/२०१३ विभाग - स्थापत्य

सुचक - मा.वैशाली जवळकर अनुमोदक - मा.निता पाडाळे

संदर्भ :- मा.वैशाली जवळकर यांचा दिनांक ६/९/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५६ वैदुवस्ती मधील जवळकरनगर येथील त्रिमुर्ती कॉलनी हे नांव बदलून तेथे समर्थ कॉलनी जवळकर नगर असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे प्रकट केले.

सही/ -
सोनाली जम
अध्यक्षा
ड प्रभाग ामिती,पिंचिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे ज्ञ १७

सही/ -
प्रशासन अधिकारी सभा शाखा
ड प्रभाग समिती ,पिंचिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे - १७

जा.क्र.ड/सभा/कावि/ २७/२०१३
दिनांक ०९ / १० /२०१३
प्रति,
मा.श्री./श्रीमती -----------------------
सदस्य / सदस्या ड प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका